# जाहिरात

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव या संस्थेतील बी.एससी च्या किमान ५० किंवा त्यापेक्षा जास्त मुलां मुलींकरीता वसतीगृहाच्या वापरासाठी इमारत शासन मान्यतेच्या अधिनु राहुन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुल्यांकनानुसार भाडेतत्वावर घेणे आहे. सदर इमारत भाडयाने घेण्यासाठी खालील अटींची पुर्तता होण्याची आवश्यकता आहे.

१. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव जिल्हा स्त्री रुग्णालय परिसर, धाराशिव पासुन ०५ कि.मी. च्या अतील अंतरावर असणे आवश्यक आहे.
२. सदर इमारतीत किमान ५० किंवा त्यापेक्षा अधिक विद्यार्थी राहतील असे प्रावधान असणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक रुम / ब्लॉकमध्ये स्वतंत्र प्रसाधनगृह असणे आवश्यक आहे.
३. उदवाहन व सौरउर्जा व्यवस्था असलेल्या इमारतींना प्राधान्य देण्यात येईल.
४. सदर इमारतीमध्ये मुला - मुलींना ये-जा करण्यासाठी स्वतंत्र प्रवेशद्वार असावे. तसेच इमारतीमध्ये पार्कींग, मुबलक पाणीपुरवठा, मुबलक सुर्यप्रकाश तसेच खेळती हवा असणे आवश्यक आहे.
५. सदर इमारतीत राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकांची पुर्तता करण्याजोगे कक्ष उपलब्ध असणे आवश्यक आहे.

तरी इच्छुक व्यक्ती / संस्थांनी इमारती संबंधी मालकी हक्क सर्व कागदपत्रे, बांधकाम परवाना, बांधकामाच्या नकाशासह (पाणीपट्टी, विज देयक व इतर कर अदा केलेल्या पावत्या सोबत जोडण्यात याव्या) ही जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन कार्यालयीन कामाचे १० दिवसांच्या आत प्रत्यक्ष किंवा deangmcosmanabd@gmail.com या ई-मेलवर अर्ज सादर करावा. तसेच दरपत्रक सिलबंद पॉकेटात सादर करावा.

टिप :- अर्ज स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा हक्क निम्नस्वाक्षरीतांकडे राखुन ठेवण्यात आलेला आहे.

**(डॉ. शैलेंद्र द चौहान)**
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
धाराशिव